पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

हिंदुस्थान

७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com

■ वर्ष ७६ वे/अंक १७७ वा ■ ■ अमरावती, गुरुवार, दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर २४ माघ १९४७ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.००

हे ट्रेड डील नाही तर होलसेल सरेंडर

राहुल गांधींच्या विधानाने लोकसभेत गदारोळ

नवी दिल्ली दि. ११ : लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा होत असताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापाराबाबत झालेल्या करारावरून सरकारवर हल्लाबोल केलाय. या करामुळे अमेरिकेसाठी दरवाजे उघडले गेले असून भारताला याचा काहीही फायदा नसल्याचं म्हटलंय.

राहुल गांधी लोकसभेत बोलत असताना राहुल गांधी यांनी प्रश्न केला की, अमेरिका आपल्याला तेल कोणाकडून खरेदी करायचं याबाबत सांगतेय? अमेरिका त्यांचे निर्णय कसे घेताता? सरकारने देश विकला आहे. अमेरिकेने तेल खरेदीवर निर्बंध लादले आहेत. आपण कोणाकडून तेल खरेदी करायचं हे ट्रम्प कसं ठरवू शकतात?

इतकंच नाही तर कृषी क्षेत्र देखील अमेरिकेसाठी खुलं करण्यात आलंय. सरकारने शेतकऱ्यांचा विचार केलेला नाही. हा व्यापार करार म्हणजे पूर्णपणे सरेंडर आहे, असा घणाघात राहुल गांधींनी सरकारवर केलाय.

राहुल गांधी पुढे म्हणाले की, येत्या काळात ख्र चे अनेक परिणाम होतील याबाबत मी सरकारला आताच इशारा देईन. इन्फॉर्मेशन आणि टेक्नॉलॉजीमध्ये अग्रस्थानी असलेल्या कंपन्यांना अडचणीचा सामना करावा लागू शकतो. अमेरिकेला फक्त भारताचा डेटा हवा आहे.

मी इकोनॉमिक सर्वे पाहिला आणि मला त्यात दोन गोष्टी आढळल्या. ठोस *(उर्वरित पान २ वर)*

'एन. ए.' परवानगी इतिहासजमा

बांधकाम नकाशा हीच एन. ए. परवानगी; जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची संपली गरज; महसूलमंत्र्यांची जमीन महसूल कायद्यात महत्वाची सुधारणा

मुंबई. दि. ११ : राज्यात कृषी क्षेत्र अकृषक करताना एन. ए. परवानगीची अट रद्द करण्यात आली आहे. एन. ए. करताना आता नगर रचना विभाग आणि स्थानिक प्राधिकरणाने दिलेली बांधकाम नकाशा परवानगी हीच आता एन. ए. परवानगी असणार आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून स्वतंत्र बांधकाम परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला असून राजपत्र जारी करण्यात आले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत महत्वपूर्ण सुधारणा करण्यात आली. आता वार्षिक अकृषक कर देखील रद्द करण्यात आला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची गरज संपली

आतापर्यंत नागरिकांना नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम नकाशाला मंजूरी घेतल्यानंतर पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांकडे अकृषक परवानगीसाठी चकरा माराव्या लागत होत्या. नव्या नियमानुसार, जर एखाद्या जमिनीचा वापर विकास आराखड्यानुसार अनुज्ञेय असेल, तर नियोजन प्राधिकरणाने दिलेली बांधकाम परवानगी हीच 'अकृषक परवानगी' मानली जाईल. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची किंवा सनदेची गरज राहणार नाही.

बँक कर्जासाठी सनदेची अट रद्द

अनेक बँका कर्ज देताना अकृषक सनदेचा आग्रह धरतात. मात्र, शासनाने स्पष्ट केले आहे की, नियोजन प्राधिकरणाची परवानगी मिळाल्यावर बँकांनी सनदेसाठी आग्रह धरू नये. जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश सर्व बँकांच्या निदर्शनास आणून द्यावेत, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

जुन्या थकबाकीतून मुक्तता

ज्या नागरिकांचा अकृषक कर थकीत आहे, त्यांना दिलासा देताना शासनाने या *(उर्वरित पान २ वर)*

राष्ट्रगीत वंदे मातरम् बद्दल सरकारने बदलले नियम

नवी दिल्ली दि. ११ : राष्ट्र गान 'जन गण मन' प्रमाणे आता राष्ट्र गीत 'वंदे मातरम्' सुद्धा सरकारी कार्यक्रमात वाजवणं आणि गाणं अनिवार्य केलं आहे. राष्ट्रगीत वंदे मातरम आणि राष्ट्रगान जन गण मन एकत्र गायलं किंवा वाजवलं जात असेल तर वंदे मातरम् पहिलं वाजवलं जाईल. इतकच नाही, तर गायन आणि वादनाच्या वेळी श्रोत्यांना सावधन मुद्रेतच उभं रहावं लागेल. सहाकडवी असलेल्या ३ मिनिट १० सेकंदांच्या वंदे मातरम् चे गायन करावे लागणार आहे. याआधी वंदे मातरम् ची दोन कडवी गायली जात होती. तिरंगा फडकवताना, सरकारी कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या आगमनावेळी, त्यांच्या भाषणावेळी, देशाला संबोधित करण्याच्या आधी आणि नंतर. सोबतच राज्यपालांच आगमन आणि त्यांच्या भाषणाआधी आणि नंतर, वंदे मातरम् संबंधी केंद्रीय गृहमंत्रालयाने निर्देश दिले आहेत.

न्यूज रील किंवा डॉक्यूमेंट्री दरम्यान राष्ट्र गीत कुठल्या चित्रपटाचा भाग म्हणून दाखवलं जात असेल तर प्रेक्षकांकडून उभं राहण्याची अपेक्षा नसेल. कारण प्रेक्षक उभे राहिल्यास फिल्मच्या प्रदर्शनात बाधा येईल तसचं राष्ट्रगीताचा मान वाढण्याऐवजी अव्यवस्था आणि भ्रम अशी स्थिती निर्माण होईल.

हे निर्देश इंग्रजी आणि हिंदीमध्ये सर्व राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात, *(उर्वरित पान २ वर)*

कोई माई का लाल पैदा नहीं हुआ जो...! लोकसभेत राहुल गांधींच्या विधानावर रिजिजू भडकले

नवी दिल्ली दि. ११ : लोकसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात जोरदार रणकंदण बघायला मिळाले. भारत□ अमेरिका व्यापार कराराच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर थेट हल्ला चढवत गंभीर आरोप केले. हा करार म्हणजे संपूर्ण शरणागती असल्याची टीका त्यांनी सरकारवर केली.

यावेळी राहुल गांधी यांनी दावा केला की, भारत□अमेरिका व्यापार करार हा समान अटींवर झालेला नाही. या करारात भारतीय शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यात आले नाही. यापूर्वी असा निर्णय *(उर्वरित पान २ वर)*

रोहित पवारांच्या पत्रकार परिषदेनंतर मुंबईपासून दिल्ली हादरली, डीजीसीएची टीम तात्काळ बारामतीत

मुंबई दि. ११ : अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. बारामती विमानतळाजवळ झालेल्या अपघातात अजित पवारांसह ५ जणांचे निधन झाले होते. त्यानंतर काल आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेत अजित पवारांच्या विमान अपघातावर अनेक प्रश्न उपस्थित केले होते. तसेच बारामती विमानतळाबाबत आणि विमान कंपनीच्या कार्यशैलीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर बारामती विमानतळावरील सुविधांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहेत. त्यानंतर आज डीजीसीएची टीम तात्काळ बारामतीत दाखल झाल्याचे पहायला मिळाले.

बारामती विमानतळाची नागरी उड्डाण महासंचालनालयच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे. विमानतळाची सुरक्षा व्यवस्था, धावपट्टीची स्थिती, तांत्रिक सुविधा तसेच आपत्कालीन यंत्रणा यांची सविस्तर तपासणी करण्यात आली. विमानतळ सुरक्षित आहे का, याबाबतचा अंतिम निर्णय पाहणीनंतर तयार होणाऱ्या अहवालावर अवलंबून राहणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून लवकरच सविस्तर अहवाल सादर केला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. या पाहणीमुळे विमानतळाच्या सुरक्षा मानकांबाबत स्पष्टता येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

रोहित पवार यांनी आपल्या पत्रकार परिषदेत म्हटले होते की, शेवटच्या क्षणी काय घडले हे शोधून काढण्याची गरज आहे. ट्रान्सपॉन्डर का बंद करण्यात आला? धावपट्टी ११वर उतरवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न का करण्यात आला? जर विमान धावपट्टी २९वर उतरले असते तर कदाचित इतका मोठा अपघात झाला नसता.

विमानाच्या उतरवण्याच्या वेळी दृश्यमानतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत अजित पवार यांनी विचारले, जेव्हा विमान उतरवण्यासाठी डीजीसीएची मार्गदर्शक तत्त्वे ५००० मीटर दृश्यमानता आहे, तेव्हा विमान ३००० मीटर दृश्यमानतेवर का उतरवले गेले? कमी दृश्यमानता जाणूनबुजून योग्य होती का? अपघातात पायलट पाठकची चूक नव्हती का? पायलट कपूरबद्दल आमचे अनेक प्रश्न आहेत आणि आम्हाला उत्तरे हवी आहेत, आणि शक्य तितक्या लवकर.

माहोल....

आजकाल राजकारणात अशीच असते दोस्ती...सत्तेसाठी एकत्र आले पण कोण कोणाचा कधी काटा काढेल हे काहीच सांगता येत नाही!!

राईट टू रिकॉल कायद्यामध्ये आता आमदार, खासदारही बरखास्त होणार

नवी दिल्ली दि. ११ : महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि राजस्थान यांसारख्या राज्यांमध्ये ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसभेच्या माध्यमातून प्रतिनिधींना हटवण्याची तरतूद आहे. अशीच व्यवस्था विधानसभा आणि लोकसभेसाठी करण्यात यावी अशी मागणी केली जातेय. काम न करणाऱ्या आणि आश्वासने पाळणाऱ्या खासदार आणि आमदारांना मतदारांनी पदावरून हटवण्याची ताकद देणारा 'राईट टू रिकॉल' कायदा देशात लागू करण्यात यावा, अशी मागणी राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी केली आहे.

राघव चड्ढा आम आदमी पार्टीचे राज्यसभा खासदार आहेत. बजेट सत्र २०२६ दरम्यान शून्य प्रहरात बोलताना राघव चड्ढा यांनी लोकशाहीतील एका मोठ्या त्रुटीवर बोट ठेवले. देशातील लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी या नवीन व्यवस्थेची गरज असल्याचे म्हटलं आहे. निवडणुकांआधी नेते जनतेच्या मागे असतात, *(उर्वरित पान २ वर)*

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी घेतली पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमित शाह यांची भेट

नवी दिल्ली दि. ११ : अजित पवार यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला, या अपघातामध्ये त्यांचं निधन झालं, दरम्यान अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, त्यानंतर त्यांनी मंगळवारी उपमुख्यमंत्रिपदाचा पदभार स्विकारला. उपमुख्यमंत्रिपदाचा पदभार स्विकारल्यानंतर आज सुनेत्रा पवार या दिल्ली दौऱ्यावर आहेत. त्यांनी दिल्लीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. सुनेत्रा पवार यांच्यासोबत राष्ट्रवादीचे खासदार सुनील तटकरे, प्रफुल पटेल, जय पवार आणि पार्थ पवार हे सुद्धा दिल्ली दौऱ्यावर आहेत.

सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा पदभार स्विकारल्यानंतर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची *(उर्वरित पान २ वर)*

धर्मभास्कर प. पू. सद्गुरूदास महाराज यांचे निधन; अध्यात्मिक क्षेत्रावर शोककळा

नागपूर दि. ११ : धर्मभास्कर प. पू. सद्गुरूदास महाराज उपाख्य शिवकथाकार विजयराव देशमुख यांचे सायंकाळी ७ वाजून ५ मिनिटांनी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.



गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर विवेक हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांनी अखेरचा श्वास *(उर्वरित पान २ वर)*

आज भारत बंद

नवी दिल्ली दि. ११ : केंद्र सरकारने कामगार कायद्यात केलेल्या बदलाला देशभरातून तीव्र विरोध केला जात आहे. या कामगार कायद्यांविरोधात देशभरातील दहा कामगार संघटनांनी उद्या गुरुवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी भारत बंदची हाक दिली आहे. शेतकऱ्यांच्या विविध संघटनांनीही या भारत बंदला पाठिंबा दिला असून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीनेही उद्याच्या भारत बंदला पाठिंबा दिलेला आहे.

भारत बंदला काँग्रेसचा पाठिंबा

केंद्र सरकारने कामगार कायद्यात केलेल्या बदलांमुळे कामगारांच्या समोर विविध प्रश्न व समस्या निर्माण झाल्या आहेत. कामगार कायद्यातील बदलामुळे कामगारांच्या हिताला बाधा पोहचलेली आहे, या नव्या बदलामुळे कामगारांच्या हाताला कमी संधी मिळणार आहे. केंद्रातील भाजपा सरकारचे धोरण हे शेतकरी व कामगार विरोधी असल्याने या बंदमध्ये *(पान २ वर)*

मुंबईत ४४ वर्षांनंतर भाजपचा महापौर! रितू तावडे महापौरपदी तर संजय घाडी उपमहापौरपदी विराजमान

मुंबई दि. ११ : देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेवर अखेर भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) महायुतीने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. भारतीय जनता पक्षाच्या रितू तावडे यांची मुंबईच्या महापौरपदी, तर शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाचे संजय घाडी यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली आहे. या निवडीमुळे भाजपने तब्बल ४४ वर्षांनंतर महापौरपद आपल्याकडे खेचून आणले आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी ७ फेब्रुवारी २०२६ रोजी अर्ज भरण्याची प्रक्रिया पार पडली. भाजपकडून रितू तावडे आणि शिंदे गटाकडून संजय घाडी यांनीच केवळ आपले अर्ज दाखल केले होते. विरोधी पक्षांनी आपला उमेदवार उभा न केल्याने ही प्रक्रिया बिनविरोध पार पडली. यानंतर ११ फेब्रुवारी रोजी अधिकृतपणे या नावांची घोषणा करण्यात आली.

रितू तावडे *(पान २ वर)*

■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम